आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी  १.३० वाजता

२७ एप्रिल २०२४ -शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांसाठी आता प्रचाराला आणखी वेग / प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आज कोल्हापुरात सभा तर काँग्रेस महासचिव प्रियांका गांधी यांची उद्गीर मधे सभा

- चौथ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी पूर्ण. महाराष्ट्रात एकूण ३६९ अर्ज वैध.

- मणिपूरमध्ये सशस्त्र हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात सीआरपीएफच्या दोन जवानांना वीरमरण

- तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताला तिसरं सुवर्णपदक
  **आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्सची निकराची लढाई दिल्ली कॅपिटल्स बरोबर  तर लखनौ सुपर जायंट्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात दुसरी लढत .

**<><><><><>**

सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांसाठी आता प्रचाराला आणखी वेग आला आहे. प्रमुख राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते प्रचार सभांसाठी संपूर्ण देश पिंजून काढत आहेत. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी  यांची आज कोल्हापुरात सभा होणार आहे.

महायुतीचे कोल्हापूर  मतदारसंघातले उमेदवार संजय मंडलिक आणि हातकणंगले मतदारसंघातले उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारासाठी ही सभा होणार आहे.

काँग्रेसच्या महासचिव प्रियंका गांधी आज लातूर जिल्ह्यात उद्गीर इथं महाविकास आघाडीचे उमेदवार शिवाजी काळगे यांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत.

प्रधानमंत्री मोदी आज गोव्यात वास्को इथं प्रचारसभेला संबोधित करतील. भाजपानं उत्तर गोव्यातून आताचे केंद्रीय राज्यमंत्री आणि पाच वेळा खासदार म्हणून प्रतिनिधित्व करणाऱ्या श्रीपाद नाईक यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे, तर दक्षिण गोव्यातून पल्लवी डेम्पो या नवीन चेहऱ्याला संधी दिली आहे. काँग्रेसनं उत्तर गोव्यातून  माजी केंद्रीय मंत्री रमाकांत खलप यांना तर दक्षिण गोव्यातून विरियातो फर्नांडिस यांना उमेदवारी दिली आहे. गोव्यातून लोकसभेत जाणाऱ्या दोन जागांसाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात काल सायंकाळी **७** वाजेपर्यंत सरासरी **६०** पूर्णांक **९६** शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. उष्णतेची लाट असतानाही विविध वर्गातील नागरिकांनी उत्साहानं मतदान केल्याचं चित्र अनेक मतदान केंद्रांवर पहायला मिळालं. कालच्या दुसऱ्या टप्प्यात **१२** राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशांमधील लोकसभेच्या ८८ जागांसाठी बहुतांश शांततेत मतदान पार पडलं.

राज्यनिहाय मतदानाची अंदाजे टक्केवारी याप्रमाणे –

केरळात २० ठिकाणी मतदान झालं. सुमारे ६४ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. कर्नाटकात १४ मतदारसंघातल्या ६४ टक्के तर राजस्थानात १३ मतदारसंघातल्या ६० टक्के मतदारांनी मतदान केलं. उत्तरप्रदेशात ८ जागांवर ५३ टक्के तर मध्यप्रदेशात ६ जागांवर ५५ टक्के मतदान झालं. आसामात ५ मतदारसंघात ७१ टक्के मतदारांनी आणि बिहारच्या ५ मतदारसंघात ५३ टक्के मतदारांनी आपला कौल मतदान यंत्रात नोंदवला. पश्चिम बंगालमधे ३ ठिकाणी मतदान झालं. सुमारे ७२टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. छत्तीसगडमधेही ३ ठिकाणी मतदान झालं, तिथे सुमारे ७२टक्के नागरिकांनी मतदान केलं. मणिपूर आणि त्रिपुरामध्ये एकेका मतदारसंघात मतदान झालं. दोन्हीकडे ७६ टक्क्यांपेक्षा जास्त मतदारांनी मत नोंदवलं, जम्मू काश्मीरच्या एका मतदारसंघात ६७ टक्के मतदान झालं.

महाराष्ट्रात ६ वाजेपर्यंत अंदाजे सरासरी ५९ पूर्णांक६३ शतांश टक्के मतदान झालं असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

सर्वाधिक ५६ पूर्णांक ६६ शतांश टक्के मतदान वर्ध्यात झालं. सर्वात कमी ५२ टक्के मतदानाची नोंद हिंगोलीत झाली. यवतमाळ-वाशिम, परभणी, अमरावती मध्ये सुमारे ५४ टक्के तर अकोला, बुलडाणा आणि नांदेडमध्ये ५२ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं. एकूण २०४ उमेदवारांचं भवितव्य मतदारांनी यंत्रात नोंदवलं.

**<><><><><>**

केंद्रीय काँग्रेस निवडणूक समितीची बैठक आज दिल्ली इथं पक्षाच्या मुख्यालयात आयोजित करण्यात आली आहे. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खारगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या या बैठकीत लोकसभेच्या उर्वरित जागांसाठी उमेदवारांच्या निवडीबाबत चर्चा होणार आहे. काँग्रेस संसदीय समितीच्या अध्यक्ष सोनिया गांधी, पक्षाचे सरचिटणीस के सी वेणुगोपाल राव आणि अनेक ज्येष्ठ नेते या बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

काँग्रेसच्या जाहीरनाम्यात पाच न्याय आणि २५ हमी दिल्या आहेत, त्या आम्ही पूर्ण करू, असा विश्वास काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी व्यक्त केला. गुवाहाटी इथं पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

**<><><><><>**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी राज्यातल्या चौथ्या टप्प्यातल्या मतदानासाठीच्या उमेदवारी अर्जांची छाननी काल झाली. यासाठी ४४७ उमेदवारांनी ६१८ अर्ज केले होते. छाननीनंतर नंदुरबार लोकसभा मतदारसंघात १६, जळगाव - २०, रावेर - २९, जालना - ३५, औरंगाबाद - ४४, मावळ - ३५, पुणे - ४२, शिरूर - ३५, अहमदनगर - ३६, शिर्डी - २२ आणि बीड लोकसभा मतदारसंघात ५५ असे एकूण ३६९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरल्याची माहिती मुख्य निवडणूक कार्यालयाने दिली. राज्यात चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

मणिपूरमध्ये सशस्त्र हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात सीआरपीएफच्या दोन जवानांना वीरमरण आलं तर अन्य दोन जण जखमी झाले आहेत. यामध्ये एक उपनिरीक्षक आणि एका हेड कॉन्स्टेबलचा समावेश आहे. बिष्णुपूर जिल्ह्यातल्या मोइरांग पोलिस स्टेशन हद्दीतल्या नरन सेना गावात काल मध्यरात्री पाऊण वाजेच्या सुमारास ही दुर्घटना घडली. हल्ला झाला तेव्हा सीआरपीएफचे जवान मितेई गावांजवळील नाक्यावर तैनात होते. घटनास्थळी सुरक्षा दलांच्या अतिरिक्त तुकडीनं तत्काळ धाव घेत शोधमोहीम सुरू केली आहे.

**<><><><><>**

बुलडाणा जिल्ह्यात जळगाव जामोद बुरहानपुर महामार्गावर करोली घाट इथं एका प्रवासी बसचं नियंत्रण सुटल्यानं ही बस १०० फूट खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात बसमधले २८ प्रवासी जखमी झाले. सर्व जखमींना उपचारासाठी मध्यप्रदेशात दरियापूर आणि बुरहानपूरच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.  रायल्स ट्रावेल्सची ही बस मध्य प्रदेशच्या  इंदोर इथून अकोला इथं चालली होती अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण उस्मानाबाद लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

पश्चिम बंगालच्या संदेशखली इथं काल केंद्रीय अन्वेषण संस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या जवानांनी केलेल्या झडतीसत्रात बंदूका, दारुगोळा आणि बॉम्ब जप्त केले. पाच जानेवारीला इडीच्या छाप्याला झालेल्या हिंसक विरोधानंतर संदेशखली चर्चेत आलं होतं. काल रात्री उशीरापर्यंत सुरु असलेल्या झडतीसत्रात जप्त केलेले चार बॉम्ब पोलिसांनी निकामी केले आणि बाकीची शस्त्रास्त्र जप्त केली.

**<><><><><>**

शांघाय इथं सुरु असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या ज्योती सुरेख वेन्नम, अदिती गोपीचंद स्वामी आणि परमीत कौर यांनी महिलांच्या अंतिम फेरीत इटलीला २३६ विरुद्ध २२५ असं हरवत सुवर्णपदक पटकावलं. या सामन्यात भारतीय संघानं सहाव्या मानांकित इटलीचा सहज पराभव केला. या विजयामुळे भारतानं हे तिसरं सुवर्णपदक मिळवलं आहे. याआधी ज्योती सुरेख वेन्नम आणि अभिषेक वर्मा या जोडीनं मिश्र दुहेरीत एस्टोनियाच्या संघाला १५८ विरुद्ध १५७ अशा गुणफरकानं हरवलं.

भारताच्या अभिषेक वर्मा, प्रियांश आणि प्रथमेश या पुरुष संघानं अंतिम सामन्यात नेदर्लंड्सचा २३८ विरुद्ध २३१ असा पराभव करत सुवर्णपदक पटकावलं. आज पुरुषांमध्ये प्रियांश आणि महिलांमध्ये वेन्नम यांचे आपापल्या प्रतिस्पर्ध्यांशी सामने होणार आहेत.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. पहिला सामना मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात दिल्लीच्या अरुण जेटली

स्टेडियमवर दुपारी साडेतीन वाजता रंगणार आहे. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी मुंबई इंडियन्सला आजच्या सामन्यासह सर्व सामने जिंकणं गरजेचं आहे. तर दुसरा सामना संध्याकाळी साडे सात वाजता लखनौ सुपर जायंट्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात लखनौत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे.

**<><><><><>**

तैवानला आज पहाटे वेगवेगळ्या तीव्रतेच्या भूकंपांचे दहा धक्के बसले, ज्यामध्ये सर्वात मोठा धक्का ६ पूर्णांक १ दशांश रिक्टर होता. या भूकंपाचं केंद्र तैवानच्या पूर्व किनारपट्टीवरील हुआलियन शहरापासून सुमारे ४० किलोमीटर अंतरावर १८ किलोमीटर खोलीवर नोंदवलं गेलं. दरम्यान या भूकंपामुळं कोणत्याही प्रकारचं नुकसान झाल्याचं वृत्त नसून भूकंपानंतर सुनामीचा इशारा देणारे कोणतेही अहवाल आले नसल्याचं माध्यमांनी म्हटलं आहे. आज बसलेले भूकंपाचे धक्के हे दोन आठवड्यापूर्वी तैवानमध्ये झालेल्या ७ पूर्णांक ४ रिक्टर तीव्रतेच्या मुख्य भूकंपानंतरचे धक्के होते असं तैवान सरकारनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

चार धाम यात्रेसाठीची सर्व तयारी पूर्ण झाली असून यंदा सुमारे १६ लाख भाविकांनी या यात्रेसाठी नोंदणी केली असल्याचं उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी काल माध्यमांशी बोलताना सांगितलं. चार धामयात्रेत यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ आणि बद्रीनाथ या चार तीर्थस्थळांना भाविक भेट देतात.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्याचे माजी साखर आयुक्त अरविंद रेड्डी यांचं काल पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. रेड्डी यांनी धुळे आणि ठाणे इथं जिल्हाधिकारी म्हणून काम केलं होतं. साखर आयुक्त पदाच्या त्यांच्या कारकिर्दीत पुण्यातील साखर संकुलाची वास्तू आकाराला आली होती. निवृत्तीनंतर ते दीर्घकाळ मुंबई मॅरेथॉनशी संलग्न होते.